REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# वळसंगचे स्वातंत्र्य संग्रामातील योगदान

**डॉ. एस. एन. गायकवाड**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग,
श्रीमती सी. बी. शाह महिला महाविद्यालय, सांगली.

## प्रस्तावना:



हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीमध्ये सोलापूरचे योगदान महत्वपूर्ण आहे. हुतात्मा मलप्पा धनशेट्टी, कुर्बान हुसेन, किसन सारडा, जगन्नाथ शिंदे, इत्यादींनी देश हितासाठी स्वतःच्या जीवाची परवा केली नाही. ८ मे १९३० रोजी सोलापुरात वीर नरीमन व जमनालाल बजाज यांच्या अटकेच्या निषेधार्थ प्रचंड मिरवणूक निघाली होती. यावेळी शंकर शिवदारे या तरुणास इंग्रज अधिकाऱ्यांनी बंदुकीची गोळी घालून ठार केल्याने चिडलेल्या जमावाने मंगळवार पेठ पोलीस चौकीवर हल्ला केला. त्यात दादा जाफर व चांद अल्लाउद्दिन अनुक्रमे हवालदार व कॉन्स्टेबल मारले गेले. त्याबाबत चौकशी करून मलाप्पा धनशेट्टी, कुर्बान हुसेन, किसन सारडा, जगन्नाथ शिंदे यांना दोषी ठरवले. त्यामुळे त्यांना दिनांक १२ जानेवारी १९३१ रोजी येरवडा जेलमध्ये फाशी देण्यात आली. वळसंग गावही याच जिल्ह्यातील असून ते सोलापूर पासून २५ कि. मी. अंतरावर व अक्कलकोट पासून १५ कि. मी. अंतरावर आहे. दक्षिण सोलापूर तालुक्यात या गावाचा समावेश होतो. हे गाव सुध्दा देशाच्या स्वातंत्र्य चळवळीमध्ये मागे नव्हते.

## मार्शल लॉ आणि वळसंग :

स्वतःच्या कर्तुत्वाने वळसंग या गावाने आपले नाव भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासात अमर केले आहे. महात्मा गांधी यांनी या गावाला १९२७ मध्ये भेट दिली होती. त्यावेळी गांधीजींनी येथील गावकऱ्यांना स्वातंत्र्य चळवळीबद्दल मार्गदर्शन केले होते. त्यामुळे येथील लोक देशप्रेमाने झपाटून गेले होते. परिणामी जुलमी ब्रिटीश सत्तेला ज्या ज्या मार्गांनी विरोध करता येईल त्या त्या मार्गाचा या गावाने अवलंब केला. सोलापूर मार्शल लॉ पुकारण्या अगोदर वळसंग येथे तो लावला होता.

इ.स. १९३० मध्ये गुरु शांतप्पा मोटगी व शंकर शेट्टी यांनी वळसंग पोलीस ठाण्यावर हल्ला केला[१]. तेथील हवालदार व पोलीस यांना पिटाळून लावले, त्यानंतर भर दिवसा ते पेटवून दिले. त्याच दिवशी वळसंग येथे तेथील लोकांनी ग्रामराज्य स्थापन केले. त्यामुळे तेथील नेते स्वतः त्या गावाचा कारभार पाहू लागले. न्यायनिवाडा करू लागले.

त्यामुळे या घटनेने ब्रिटीश राज्यकर्ते संतापले.

### कार्यकर्त्यांची धरपकड :

वळसंग गावामध्ये १९३० मध्ये ग्रामराज्य स्थापन झाल्यानंतर जिल्हा कलेक्टर नाईट साहेब यांनी तत्काळ भेट दिली. त्यावेळी ते गावातील शाळेत गेले असता, शाळेतील मुलांनी त्यांना पाहताच 'महात्मा गांधी की जय' 'वंदे मातरम' अशा मोठ-मोठ्याने घोषणा दिल्या. त्यामुळे कलेक्टर साहेब संतापले. परिणामी या मुलांच्या मनात स्वातंत्र्य प्रेमाचे बीजारोपण करणारे शिक्षक मलप्पा बिदरे, सिद्राप्पा कुर्ले, गुरुबसप्पा तडलगी, सातप्पा कुर्ले, हे राज्यद्रोही ठरले. त्यांना तत्काळ निलंबित करण्यात आले. त्यामुळे वळसंगला मार्शल लॉ पुकारला गेला. ब्रिटीश सैनिकांनी गावाला गराडा घातला. घराघरात लुटमार करून अनेक कार्यकर्त्यांची धरपकड केली. गावातील मारुतीच्या मंदिरासमोर शुरप्पा मणुरे, चनमलप्पा कुर्ले, देवबडे, भंडे इत्यादी लोकांना फटके मारण्यात आले. तर महांतप्पा कोंडे, डॉ. माटे, सिद्रामप्पा कुर्ले, गुरु सिद्धप्पा आंटद, चनवीरप्पा मायनाळे, सिद्रामप्पा मायनाळे इत्यादींना अटक करून सोलापूरला नेले. त्यांना सहा महिने ते दोन वर्षापर्यंत शिक्षा दिल्या गेल्या. तर गुरुबसप्पा तडलगी, रुपसेन कर्जाळ, धानप्पा, शिवप्पा मेंच यांना फटक्यांची शिक्षा झाली. या सर्व घडामोडीमुळे वळसंगची शाळा बंद केली गेली. ती सुरु व्हायला १९३६ हे साल उजाडले[२]. या वेळी खेर सरकारची कारकीर्द होती, त्यामुळे निलंबित शिक्षकांना परत कामावर घेतले.

### मिठाचा सत्याग्रह आणि वळसंग :

१४ फेब्रुवारी १९३० रोजी राष्ट्रसभेने महात्मा गांधीच्या नेतृत्वाखाली सविनय कायदेभंगाचा जनतेला आदेश दिला. समुद्राच्या मोफत मिळणाऱ्या पाण्यापासून निर्माण होणाऱ्या मिठावर सरकारने कर लादला होता तो अन्यायी आहे, असे महात्मा गांधींना वाटले व कायदेभंगाची चळवळ मिठाचा सत्याग्रह करून सुरु करावी अशी त्यांना कल्पना सुचली[३]. ५ एप्रिल रोजी म. गांधीजी दांडीला पोहोचले व त्यांनी मिठाचा कायदा मोडला. परिणामी देशाच्या कानाकोपऱ्यात प्रचंड सभा, मोर्चे, आंदोलने, निदर्शने होऊ लागली. हजारो सत्याग्रही, शेकडो नेते तुरुंगात डांबले गेले. म, गांधीनाही ५ मे रोजी पकडून येरवड्यास रवाना केले[४]. महात्मा गांधींच्या या मिठाच्या सत्याग्रहास वळसंगने सक्रीय प्रतिसाद दिला. येथील कलप्पा के. शेट्टी, वालचंद शाह, माणिकचंद रावजी इत्यादींनी सत्याग्रहात भाग घेतला. यातील कलप्पा के. शेट्टी यांना सहा महिने शिक्षा भोगावी लागली.

### चलेजाव चळवळ आणि वळसंग :

१९४२ चे चले जाव आंदोलन देशात चांगले गाजले. या आंदोलनामुळे स्वातंत्र्याची चळवळ ही खऱ्या अर्थाने लोकचळवळ बनली. ब्रिटिशांना मायदेशी घालवण्यासाठी भारतीयांनी जणू चंगच बांधला होता असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. या चळवळीत वळसंगच्या तरुणांनी जे कार्य केले ते उल्लेखनीय असे ठरले. ब्रिटीश सरकारविरुध्द रोष व्यक्त करण्यासाठी तिलाठी रेल्वे स्टेशनवर हल्ला करण्याची योजना वळसंग, हजारगी, करजगीच्या तरुण क्रांतीकारांनी आखली. रूळावरील फिश प्लेट्स काढून सबंध वाहतूक एक दिवस बंद पाडली. या कामात वळसंगच्या कल्याणी माशाळ, मडीवालप्पा दुधनी, गुरुशांतप्पा मोटगी, हुल्लेगेरी, परमेश्वर किणगी इरप्पा, शंकरप्पा दुधगी इत्यादींनी मोलाची साथ दिली तर वळसंगच्या शेजारील गाव हजंगी हेही या चळवळीत सक्रीय होते. तेथील रामचंद्र माणके, बसवणप्पा पाटील, प्रभावती मोतीलाल शहा, राचप्पा माणके,

दोड्य्या स्वामी, सिद्रामप्पा कुंभार, शिवण्णा कलशेट्टी, विरुपाक्ष गंगदे, अप्पासाहेब पाटील इत्यादींनी सक्रीय सहभाग घेतला. येथील लोकांच्या सक्रीय सहभागामुळे चळवळ अधिक गतिमान होण्यास मदत झाली.

## हवालदारावर बॉम्ब टाकले :

या परिसरातील लोकांच्या सक्रीय सहभागामुळे या चळवळीत अनेक नवीन लोक सहभागी होत होते. त्यामुळे ब्रिटीश सरकारची झोप उडवून टाकणारी घटना अल्पावधीतच घडली. वळसंग येथील धाडसी व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जाणारे श्री परमेश्वर किणगी यांनी याच कालावधीत हातबॉंब तयार केले. आणि ते तयार केलेले हातबॉंब श्री सिद्दप्पा बंड्या स्वामी व माडीवाळप्पा दुधनी यांनी उडवण्याची प्रतिज्ञा केली. फक्त प्रतिज्ञाच त्यांनी केली नाही तर काही काळातच ती पूर्णही केली. वळसंगचे हवालदार बाळाराम तात्याराम वेशीतून प्रवेश करत असताना त्यांनी अचानक हातबॉंब टाकल. त्याचा मोठा स्फोट झालाही मात्र हवालदार जागृत असल्यामुळे थोडक्यात बचावले. मात्र याची बातमी अल्पावधीतच सर्व परिसरात पसरली त्यामुळे किणागी यांना अटक झाली. तर काही क्षणातच माडीवाळप्पा दुधनी फरार झाला. सलग सहा महिने इंग्रज अधिकारी त्यांना शोधात होते मात्र त्याचा थांगपत्ता लागत न्हवता. त्यामुळे माडीवाळप्पा दुधानी यांनी सरकारी यंत्रणेला झुलवत ठेवण्याचे काम केले असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. शेवटी ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या अथक प्रयत्नांना यश आले. त्यांना अटक झाली. मात्र पुरेशा पुराव्या अभावी माडीवाळप्पा दुधानी यांना सोडून द्यावे लागले.

## अक्कलकोट संस्थान विलीनीकरणासाठी वळसंगकरांचा लढा :

भारतात स्वातंत्र्याच्या वेळी ५६२ संस्थाने होती. अनेक संस्थानिकांना देश स्वातंत्र्य होताना आपले संस्थानही स्वतंत्र राहावे असे वाटत होते त्यास अक्कलकोट संस्थानही अपवाद नव्हते. अक्कलकोट हा सद्यस्थिती मध्ये सोलापूर जिल्ह्याचा महत्वाचा तालुका असला तरी ब्रिटीश कालखंडात ते एक छोटेसे संस्थान होते. या संस्थानाच्या सरहद्दीवर वळसंग हे गाव वसले आहे. अक्कलकोट हे संस्थान विलीन व्हावे म्हणून वळसंगच्या शेकडो लोकांनी भाग घेतला. अक्कलकोट नरेशांनी हद्दपार केलेल्या श्री वीरभद्रप्पा लोकापुरे यांना लोकांनी आश्रय दिला[५]. प्रजापरिषदेचे कार्यही या भागात चांगले होते. त्यामुळे शेवटी स्वतःच्या इच्छेविरुध्द राजेसाहेबांनी अक्कलकोटच्या विलीनीकरणाच्या करारावर सही केली व ८ मार्च १९४८ रोजी अक्कलकोट संस्थानाचे भारतात विलीनीकरण झाले[६].

## हुतात्मा मल्लप्पा धनशेट्टी यांचे योगदान:

सोलापूरच्या चार हुतात्म्यांचे योगदान हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीत महत्वाचे आहे त्यातील एक म्हणजे हुतात्मा मलप्पा धनशेट्टी होय. मलप्पाचे मूळ गाव वळसंग होय. स्वतःच्या कर्तुत्वाने भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासात त्याचे नाव अजरामर झाले आहे. त्याच्या देशाबद्दलच्या अतूट प्रेमामुळे भारावून जाऊन अनेक तरुणांनी देशाच्या स्वातंत्र्य चळवळीत स्वतःला वाहून घेतले. त्यामुळे अशा वीर पुरुषाचे हुतात्मा स्मारक वळसंग येथे आहे.

## वळसंग परिसरातील लोकांचे कार्य:

वळसंग प्रमाणेच दक्षिण सोलापूर तालुक्यात स्वातंत्र्याच्या चळवळीची ज्योत पेटत होती. विंचूर हे गाव दक्षिण सोलापूर तालुक्यात सोलापूर पासून ३९ कि. मी. अंतरावर आहे[७]. या गावचे शिवराया बगळे, बिराजदार

इत्यादींनी स्वातंत्र्य चळवळीचा गावोगावी प्रचार व प्रसार केला. मंद्रूप हे मध्यवर्ती ठिकाण असल्यामुळे त्या गावचे भगवान करपे व जक्कोणे यांनी जवळपासच्या अंदाजे २५ गावात स्वातंत्र्य चळवळीच्या प्रचाराचे काम केले.

**संदर्भ :**


१. येवले शं. भा.; सोलापूर जिल्ह्यातील स्वातंत्र्य लढा, ऑगस्ट क्रांती सुवर्ण महोत्सव समिती, मुंबई, पृष्ठ क्र. ६७.
२. कित्ता पृष्ठ क्र. ६८.
३. कोठेकर शांता, सुमन वैद्य आधुनिक भारताचा इतिहास, साईनाथ प्रकाशन नागपूर, २०१२ पृष्ठ क्र. ५०.
४. कित्ता पृष्ठ क्र. ७५.
५. दैनिक संचार, दिनांक ८ फेब्रुवारी १९७५ पृष्ठ क्र. २.
६. सोलापूर समाचार, दिनांक १५ जून १९५४ पृष्ठ क्र. २.
७. महाराष्ट्राचे जिल्हे - सोलापूर , प्रसिध्दी विभाग , महाराष्ट्र सरकार, मुंबई १९८० , पृष्ठ क्र. १३.